नि.दि.दा.क्र. ५६/२०१७
तारा वि. अशोक
नि.क्र. १५

**<u>वादी साक्षीदार क्र. ३ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विव्दान विधीज्ञ, श्री. एस. पी. लोलुसरे मार्फत शपथेवर सुरु</u> :**

**१.** माझे लग्न सन १९६४ मध्ये झाले होते. माझे लग्न झाले तेव्हा ताराबाई जिवंत होती. ती आताही जिवंत आहे. ताराबाईला अशोक नावाचा मुलगा व २ मुली आहेत. मला २ मुले व २ मुली आहे. माझं राहण मुंबईला आहे. प्रस्तुतचा दावा मी हिसेवाटणी करीता दाखल केला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मी हिसा मागितला नाही परंतु माझी जी जमीन आहे ती वेगळी करुन मागितली आहे.

प्रश्न : तुम्ही मुंबईला किती वर्षापासुन राहता?
उत्तर : मुंबईला आम्ही पुर्वीपासुन राहतो.

मी लग्न झाल्यानंतर नरखेड मध्ये सन १९६५ व १९७६ मध्ये जमीन घेतली तेव्हा आले होते. माझे पती मुंबईला वेगवेगळी कामे करायचे. मी स्वत: पण कामे करायची. हे म्हणने खरे नाही की, दावा मिळकत ही माझे पतीने त्यांच्या स्वकष्टाने विकत घेतली आहे. साक्षीदार स्वत: सांगते की, माझे पतीला आम्ही देखील जमीन विकत घेण्यास हातभार लावला होता. दावा मिळकत विकत घेण्या साठी मी माझे पतीला रु. ३६,०००/- दिले होते. दावा मिळकत एकुण किती रुपयांमध्ये माझे पतीने विकत घेतली ते मला आठवत नाही. मी माझे पतील रु. ३६,०००/- सन १९७६ मध्ये दिले होते. सदरचे ३६,०००/- मी स्वत: कमवुन माझे घरातच ठेवले होते. हे म्हणने खरे नाही की, मी माझे पतीला दावा मिळकत घेण्यासाठी रु. ३६,०००/- दिले होते हे मी खोटे सांगत आहे. तसेच हे म्हणने खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सदरची रक्कम मी घरीच ठेवली होती. हे म्हणने खरे आहे की, आजच्या घडीला दावा मिळकतीत विभागणी झाली नाही.

**<u>प्रतिवादीतर्फे विव्दान विधीज्ञ, श्री. एस. पी. लोलुसरे यांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब</u> :**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले. माझे समक्ष,

(एन. बी. राठोड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
नरखेड
दि. ०४.०७.२०१९

(एन. बी. राठोड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
नरखेड
दि. ०४.०७.२०१९